**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०७/०५/२०२३

## दि.०६/०५/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४४५/२०२३ भादवि कलम ३०४(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०५/२०२३ रोजी सकाळी ०९:१५ ते ०९:३० वा. चे दरम्यान न्यू परफेक्ट बेकर्स अँण्ड स्विट, सुदर्शन काँलनी, म्हातोबानगर झोपडपट्टीसमोर, वाकड, पुणे येथे बेकरीच्या दुकानात |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०५/२०२३ रोजी १९/४५ वा |
| फिर्यादी | :- | नागनाथ सुर्यवंशी, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक वाकड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय मो.नं. ९५६१७७८१४५ |
| आरोपी | :- | साजिद करिमुद्दीन अन्सारी, वय २४ वर्षे, रा. न्यू परफेक्ट बेकर्स ॲण्ड स्विट, सुदर्शननगर, म्हातोबानगर झोपडपट्टीसमोर, वाकड, पुणे. मुळगाव नई बस्ती, नौगावाँ सादात, नुरानी मस्जिद च्या जवळ, जि. अमरोहा, राज्य उत्तरप्रदेश<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी काम करणारा कामगार आरोपी व त्याचे सोबतचा कामगार मयत मुलगा, वय १४ वर्षे ०६ महिने, रा. न्यू परफेक्ट बेकर्स अँण्ड स्विट, म्हातोबानगर, झोपडपट्टीसमोर, वाकड, पुणे मुळ रा. मोहल्ला सत्यान, बढापुर, ता. नगीना, जि. बिजनौर, राज्य उत्तरप्रदेश यांचेत बेकरीतील कामाच्या कारणावरुन झालेल्या झटापटीमध्ये दोघांनी एकमेकांना हाताबुक्यांनी मारहाण केली. त्यामध्ये मयत याचे हातात असलेली टोस्ट कापण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी पट्टी खेचून घेऊन ती मयत याचे डोक्याच्या मागील बाजूस मानेवरती मारल्यास त्याचा मृत्यू होऊ शकतो याची जाणीव असतानाही त्यास मारहाण केली त्यामुळे त्याचा मृत्यू झाला म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि ठाकुर ९७०२६५११०० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४४३ /२०२३ भा.दं.वि. कलम ३५४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०५/२०२३ रोजी २३.४५ वा चे सुमा. प्रेरणा बँकेशेजारी, अमरदीप कॉलनी नं. ०२, काळेवाडी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०५/२०२३ रोजी ०४/१३ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | रामकृपाल गणेश पाल वय ५० वर्षे रा. तापकीरनगर, काळेवाडी, पुणे. मुळगांव- गोरखपुर, उत्तरप्रदेश राज्य<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी जेवण झाल्यानंतर त्यांचे कॉलनीमध्ये फिरत असताना फिरता फिरता काळेवाडी बी.आर.टी रोडकडे प्रेरणा बँकेचे शेजारी आल्या असता बी.आर.टी रोडचे फुटपाथवरुन एक ईसम फिर्यादी यांचे दिशेने आला, त्यावेळी फिर्यादी या घाबरल्याने बँकेशेजारील कट्यावर बसलेल्या भाजीवाल्या डोनापुरे काकुंकडे त्या गेल्या असता सदरचा इसम हा जोरात फिर्यादीचे पाठीमागे आला व त्याने फिर्यादीचे शिटवरुन हात फिरविल्याने फिर्यादीचे मनात लज्जा उत्पन्न झाली, म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि दाभाडे ९८८१२८९४८३ |

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- निगडी २९२/२०२३ भा.द.वि.क. ३२४,५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०५/०५/२०२३ रोजी १६/०० वा सुमारास फातीमा मस्जिदजवळ ,रामदास ताठे यांचे घरामागे ओटास्किम निगडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०६/०५/२०२३ रोजी ०३/०८ वा

फिर्यादी :- फिर्यादी महिला वय ३५ वर्षे धंदा - गृहिणी रा. फातीमा मस्जिदजवळ ,रामदास ताठे यांचे घरामागे ओटास्किम निगडी पुणे मो.नं. ७३५०९११६५४

आरोपी :- करण हरिजन वय १९ वर्षे रा. ओटास्किम निगडी पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी हा फिर्यादी यांचे राहते घराचे वरील मजल्यावर राहणेस असून आरोपीने फिर्यादी यांचे घराचा दरवाजा दोन तीन वेळेस वाजवल्याने त्याबाबत फिर्यादी यांनी आरोपीस विचारणा केल्याने आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ करून लोखंडी चाकूने त्यांचे डोक्यास मारून त्यांना जखमी केले म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा साळवी ९८३४२९४५७९

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- तळेगाव दाभाडे २२५/२०२३ भा द वि कलम ४५४,४५७, ३८० प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०४/०५/२०२३ रोजी चे रात्रौ ०९.३० वा ते दि ०५/०५/२०२३ रोजीचे सकाळी ०७.०० वा चे दरम्यान पिटर इंग्लड शो रूम तळेगाव खांडगे शो रूम तळेगाव दाभाडे

गुन्हा दाखल :- दि ०६/०५/२०२३ रोजी १३.२८ वा

फिर्यादी :- किरण दिलीप निघोजकर वय २८ वर्षे व्यवसाय पिटर इंग्लंड शो रूममध्ये मॅनेजर रा अल्टीनो कॉलनी तळेगाव रेल्वे स्टेशन तळेगाव ता मावळ जि पुणे

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी पिटर इंग्लंड शो रूम मधुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने शो रूमचे लोखंडी शटर कशानेतरी तोडुन शो रूममध्ये प्रवेश करून ५,५००/- रू चे रोख रक्कम व एक काळया रंगाचा टी शर्ट असे चोरी करून घेवुन गेला आहे

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा गोरे ८२७५२५०४४७

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ४४४/२०२३, भा.द.वि.कलम ४२०,४०६, ५०४,५०६, ३५२,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- माहे मे २०२२ ते आज रोजी पर्यंत काळाखडक, वाकड, पुणे येथे आरोपीचे कार्यालयात

गुन्हा दाखल :- दि.०६ /०५/२०२३ रोजी १३/२४ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी वय ३१ वर्षे, धंदा गृहिणी, रा. सर्व्हे नं. ७०/७१, राजीव गांधी नगर, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१

आरोपी :- १)महिला आरोपी २) वाजिद सय्यद रा. सदर ३) अरविंद कांबळे
४)फिर्यादीचे पती लखन साहेबराव कांबळे, ५) महिला आरोपी
**आरोपी अटक नाहि**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे त्यांच्या पतिशी आरोपी क्र ४ यांचेशी वाद सुरु असुन त्याबबत मा.

न्यायालयात दावा दाखल आहे. आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीस तुला न्याय मिळवुन देईल असे सांगुन तीचेकडुन प्रथम ५०००/- त्यानंतर पुन्हा ५०००/-रुपये घेतले. त्यानंतर फिर्यादी महिलेस "१०,०००/- रुपये पी.ए. यांना द्यायचे आहे. जर तु पैसे दिले तरच ते तुझे काम करतील"असे सांगुन पुन्हा १००००/- रुपये देण्यास भाग पाडले. फिर्यादी महिलेचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे माहिती असतांना सुध्दा आरोपींतांनी तुझे काम आम्ही वरीष्ठ पातळीवरुन करणार आहोत असे सांगुन , पी. ए. यांच्या नावाने आणखी पैसे देण्यास भाग पाडुन एकुण ३००००/- रुपये घेवुन फसवणुक केली आहे. फिर्यादी महिला यांनी वारंवार पाठपुरावा केल्यावर यातील आरोपींनी त्यांचे पती व सासु यांना बोलावुन मिटींग घेतली असता त्यामध्ये यातील आरोपी क्र. १, २, ३ व तीचे पती व सासु यांनी तीस शिवीगाळ, दमदाटी करुन आंगावर धावुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि लोहार ९८५०२२३१९०

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ५०३ /२०२३ भा.द.विकलम ४२०,४०६ माहिती तंत्रज्ञानकायदाकलम ६६(ड) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १४/०४/२०२३ रोजी दुपारी १२.३९ वा थायसनकृप,इंडस्ट्रीज, आंबेडकर चौका जवळ, पिंपरी, पुणे

गुन्हा दाखल :- दिं ०६/०५/२०२३ रोजी २३.१५ वा.

फिर्यादी :- चिन्मय राजन पंडित, वय ३९ वर्षे, धंदानोकरी, रा. जी/११०१, पार्क आयव्हरी, पार्क स्ट्रीट वाकड, पिं.चिं. पुणे

आरोपी :- व्हाटसअप मो.नं. अ ८५६२०९७६७११० मोबाईल धारक अनोळखी इसम नामे तेज बाबु

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचेशी व्हाटसअप मो.नं. मोबाईल धारक आरोपी याने व्हॉट्सॲप व टेलिग्राम आयडी वरुन फिर्यादी यांचेशी ओळख करुन, त्यांचा विश्वास संपादन करुन, त्यांचेकडुन वेळोवेळी ऑनलाईन पैसे घेवुन फिर्यादी यांची ३६,०२,५००/-रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि (गुन्हे) बोबडे
९६५७३१५३१५

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३०३/२०२३ भा.द.वि.कलम३३८,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६.०४.२०२३ रोजी १५.५२ वा. विकास हौसींग सोसायटी, रुपीनगर तळवडे पुणे.

गुन्हा दाखल :- दि.०६/०५/२०२३ रोजी १८/४९ वा.

फिर्यादी :- अतुल महादेव बेळे वय ४१ वर्षे धंदा व्यवसाय रा.विकास हॉसींग सोसायटी, रुपीनगर तळवडे पुणे.

आरोपी :- महाराष्ट् राज्य विदयुत वितरण कंपनीचे तत्कालीन अधिकारी

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचे परीसरात राहणारे लोकांनी वेळोवेळी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे कार्यालयास त्यांचे घराजवळुन गेलेली हायटेंशन वायर अंडर ग्राऊड टाकण्यास तोंडी व लेखी सांगुन देखील महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीचे आधिका-यांनी त्याकडे दुर्लक्ष केले व त्यांनी सदरची हायटेंशन वायर ही अंडर ग्राऊड न टाकता निष्काळजीपणाने व हालगर्जीपणाने पोलवर उघडी ठेवली. त्यामुळे फिर्यादी यांचा मुलगा हा पतंग खेळत असताना त्याचा पंतग फिर्यादी यांचे घराजवळुन गेलेल्या हायटेंशन वायरला आडकले, ते पतंग तो टेरेसवर पडलेल्या जुन्या केबलच्या सहाय्याने काढत असताना त्या हायटेशन वायरचा मोठा स्पार्क झाल्यामुळे त्यास शॉक लागुन त्याचे अंगावरील कपडे जळुन, भाजुन त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि मस्के ७७७४८२२०२६